# १०. घाटातली वाट

• ऐका. वाचा.



घाटातली वाट,
काय तिचा थाट !
मुरकते, गिरकते,
लवते पाठोपाठ.

निळी-निळी परडी,
कोणी केली पालथी ?
पानं-फुलं सांडली,
वर आणि खालती.

खाली खोल दरी,
वर उंच कडा,
भला मोठा नाग, जणू
उभा काढून फडा.

भिऊ नका कोणी,
पाखरांची गाणी,
सोबतीला गात गात,
खळाळतं पाणी.

घाटातली वाट,
काय तिचा थाट!
गाणी म्हणू, टाळ्या पिटू,
जाऊ रुबाबात.

**– सरिता पदकी**

शब्दार्थ : **घाटातली वाट** – डोंगर ओलांडून जाण्याचा रस्ता, डोंगरावरची वळणावळणाची वाट. **मुरकणे** – मुरडणे. **गिरकणे** – गिरकी घेणे, स्वत:भोवती फिरणे. **लवणे** – वाकणे. **परडी** – फुले ठेवण्याची टोपली. **पालथी** – उपडी, उलटी. **फडा** – फणा. **पाखरू** – पक्षी.

**स्वाध्याय**

प्र. १. शेवटी समान अक्षर असणारे कवितेतील शब्द लिहा.

(अ) वाट (आ) गिरकते (इ) गाणी

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (१) | खळाळत जाणारे | (अ) | घाटातील वाट |
| (२) | खोल | (आ) | पाणी |
| (३) | उंच | (इ) | दरी |
| (४) | मुरकणारी, गिरकणारी | (ई) | कडा |

**प्र. ३. कवितेतील खालील अर्थाच्या ओळी शोधा व लिहा.**

(अ) घाटात इकडे तिकडे उगवलेली फुले पाहून कोणाची तरी फुलांची टोपली पालथी पडली व त्यातील फुले खाली सांडली, असे वाटते.


(आ) खोल दरीच्या बाजूला उंच कडा पाहून नाग फणा काढून उभा राहिला आहे, असे वाटते.

**प्र. ४. 'खळखळ' या नादमय शब्दापासून बनलेला 'खळाळतं' हा शब्द कवितेत आला आहे. असे आणखी नादमय शब्द सांगा.**

**प्र. ५. 'पाठोपाठ' हा शब्द कवितेत आलेला आहे. या शब्दासारखे खालील शब्द वाचा. लिहा. त्यांसारखे आणखी शब्द माहीत करून घ्या.**

काठोकाठ, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, गल्लोगल्ली, गावोगाव.

**प्र. ६. चित्रांत रस्त्यांचे काही प्रकार दिलेले आहेत, ते पाहा. त्यांची नावे वाचा. याशिवाय तुम्ही पाहिलेल्या रस्त्यांचे वर्णन करा.**




घाटातील वाट



शेतातील पायवाट




डांबरी रस्ता



सिमेंटचा रस्ता



पदपथ



उड्डाणपूल

**शिक्षकांसाठी** : कविता विद्यार्थ्यांकडून गटांत वाचून घ्यावी. कविता तालासुरात गाऊन घ्यावी. या पृष्ठावर दिलेल्या चित्रांतील रस्त्यांचे वर्णन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.